2011031911513900

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रु. १६४०-२९०० ह्या वेतनश्रेणीतील रिक्त असलेले एक पद शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवर सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून वर्ग करण्यास व सदर पदासाठी शैक्षणिक अर्हता विहित करण्यास शासन मान्यता.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र.पीसीसी-२०९३/१९०४/प्र.क्र.११५/नवि-२२
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १८ एप्रिल, १९९५.

पहा:- आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांची पुढील पत्रे.

१] क्रमांक प्रशा/४/कावि/४७७/९३, दिनांक १८.६.१९९३.
२] क्रमांक प्रशा/४/कावि/५७६/९४, दिनांक १९.१.१९९४.
३] क्रमांक प्रशा/४/कावि/१३३/९४, दिनांक दिनांक ७.३.१९९४.
४] क्रमांक प्रशा/४/कावि/१०५४/९४, दिनांक २८.११.१९९४.
५] क्रमांक प्रशा/४/कावि/४८/९५, दिनांक १७.१.१९९५.
६] क्रमांक प्रशा/४/कावि/४८/९५, दिनांक १८.२.१९९५.

शासन निर्णय:- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम-५१ [४] व अनुसूचीतील प्रकरण-२ नियम-४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून शासन याद्वारे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रु. १६४०-२९०० या वेतनश्रेणीतील रिक्त असलेले सहाय्यक प्रशासन अधिकारी संवर्गाचे एक पद, शिक्षण मंडळाकडे रु. १६४०-२९०० या वेतनश्रेणीत वर्ग करण्याच्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रस्तावास मान्यता देत आहे. तसेच सहाय्यक प्रशासन अधिकारी ह्या पदासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी विहित करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देत आहे.

पदनाम	वेतनश्रेणी	शैक्षणिक अर्हता
सहाय्यक प्रशासन अधिकारी	रु. १६४०-२९००	अ] सरळसेवा: १] कोणत्याही शाखेची पदवी व बी.एड. अर्हता धारण करणे आवश्यक. बी.एड. उमेदवाराने बी.एड अर्हता धारण केल्यानंतर प्रत्यक्ष शिकविण्याचा ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये. २] मागास वर्गीय उमेदवारासाठी ५ वर्षांनी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. ब] पदोन्नतीने:- शिक्षण मंडळाकडील सेवाजेष्ठ पर्यवेक्षकामधून जो जो कोणत्याही शाखेचा पदवीधर व बी.एड अर्हता धारक आहे व त्यांनी

[illegible] आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

([illegible] पाटील)
महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी

प्रति,
[illegible]
[illegible]
[illegible] ([illegible])
[illegible] ([illegible])